SUCCESS KEY TEST SERIES

X- Semi English

(Unit Test-2 Marathi (semi) Ch- 6 to 10)

मराठी

DATE:

TIME:१ तास ३०मी

MARKS: 40

SEAT NO:

विभाग १ - गदय

प्र. १ उता-याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा (गद्य)

1 A1) कोष्टक पूर्ण करा. 2

1) 

2) 

मी एवढं सगळं सांगितलं, कारण मी तुम्हांला खूप जवळून पाहिलंय. तुमच्या शिक्षकांनी तुम्हांला वर्गात शिस्तीत बसलेलं बघितलंय; पण मी तुम्हांला मैदानात मनसोक्त गोंधळ घालताना बघितलंय. तुमचा गोंधळ बघून सगळे म्हणायचे अशी पोरं आम्ही कुठं पाहिली नाहीत; पण मला राग आला नाही. तुम्ही मोठे झाल्यावर जग म्हणालं पाहिजे, की अशी पोरं आम्ही कुठं पाहिली नाहीत. मला आनंद होईल. फक्त तुम्ही आता अाहात तसेच आनंदी रहा. जग विचारेल तुम्हांला, शाळेत तुम्हांला किती गुण मिळाले? पण मी सांगेन जगाला तुम्ही किती गुणी आहात. मी तुम्हांला वर्गा बाहेर पाहिलंय दंगामस्ती करताना, मैदानावर, स्नेहसंमेलनात, होस्टेलवर. असेच मनसोक्त जगा. हे क्षण पुन्हा मिळवता येणार नाहीत. हे गुण पुन्हा मिळवता येणार नाहीत. माजी राष्ट्रपती डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना दहावीत किती गुण होते हे कुणाला माहीत नसतं; पण ते किती आदर्श व्यक्ती होते हे सगळ्या जगाला माहीत आहे. तुम्ही आयुष्य कसं जगता हे महत्त्वाचं आहे. तुम्ही जगाकडे कसं बघता हे महत्त्वाचं आहे. दहावीत कुणाचे गुण जास्त असणार कुणाचे कमी असणार; पण आयुष्यात तुम्ही जे काही कराल त्यात तुमच्यासारखेच तुम्ही असणार. मला विश्वास आहे. खूप खूप शुभेच्छा !

A2) i) योग्य पर्याय निवडून वाक्य पूर्ण करा. 1

1) सगळ्यात महत्त्वाचं म्हणजे तुम्ही .....

अ. दहावीत किती गुण मिळवता.

ब. किती अभ्यास करता.

क. आयुष्य कसं जगता.

ड. सर्वांशी कसे वागता.

2) माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जे अब्दुल कलाम ..... हे सगळ्या जगाला माहीत आहे.

अ. किती हुशार व्यक्ती होते.

ब. किती आदर्श व्यक्ती होते.

क. हुशार वैज्ञानिक होते.

ड. उत्तम वक्ता होते.

ii) खालील विधाने सत्य की असत्य ते लिहा. 1

1) आप्पांनी मुलांना वर्गात शिस्तीत बसलेलं पाहिलयं.

2) विद्यार्थी मैदानात शिस्तीत खेळतात.

A3) विरूद्धार्थी शब्द लिहा. 2

1) गुणी × .....

2) कमी × .....

3) राग × .....

4) आनंदी × .....

A4) स्वमत 2

'जग विचारेल तुम्हाला, ... तुम्ही किती गुणी आहात.' या वाक्यांतील अभिप्रेत अर्थ लिहा.

विभाग २ - पदय

प्र. २ (अ) खालील पद्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (पद्य)

1 **A1)** आकृतिबंध पूर्ण करा. 2



उंच उडवलेला चेंडू आभाळाला शिवून
नेमका येऊन पडतो तिच्या ओंजळीत.
मुलगा पाहत राहतो आश्चर्यचकित.
तशी हसून म्हणते ती, 'आता तू.'
मांडी घालून मुलगा बसतो गॅससमोर.
दोन्ही हातांनी थोपटत झोपवतो बाहुलीला प्रथम;
मग शोधतो पातेलं भाजीसाठी...
हळूहळू शिकेल तोही
आपलं कसब दाखवतानाच घर सांभाळणं
तापलेल्या उन्हाच्या आडोशाला बसून.
माझ्या घराच्या झरोक्यातून दिसतं आहे
एक आश्वासक चित्र उद्याच्या जगाचं
जिथं खेळले जातील सारेच खेळ एकत्र.
भातुकलीतून प्रवेशताना वास्तवात
हातात हात असेल दोघांचाही
ज्यावर सहज विसावेल बाहुली आणि चेंडू जोडीनं.

A2) कवितेतील खालील घटनेतून / विचारातून आढळणारा व्यक्तीचा गुण लिहा. 2

1) मांडी घालून मुलगा बसतो गैससमोर - .....

2) जिथे खेळले जातील सारेच खेळ एकाच वेळी - .....

A3) i) खालील शब्दसमूहांचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा. 1

आश्वासक चित्र - .....

ii) पुढील शब्दांना कवितेला अनुसरून अर्थ स्पष्ट करा. 1

कसब - .....

A4) काव्य सौंदर्य लिहा 2

'स्त्री-पुरूष समानतेबाबत तुम्हांला अपेक्षित असलेले चित्र तुमच्या शब्दांत रेखाटा.

(आ) प्रस्तुत कवितेचे पुढील कृतिनिहाय रसग्रहण करा **(4)**

मी दोन्ही करू शकते एकाच वेळी, तू करशील ?

विभाग ३ - स्थ्लवाचन

प्र. ३ खालील कोणत्याही एक कृती सोडवा. **(3)**

1) i. पुढील आकृतीबंध पूर्ण करा.



ii. सहसंबंध स्पष्ट करा.

1. बी → झाड → माणूस →.....
2. बी → माती →पाऊस → .....

2) कृती पूर्ण करा.

i.



ii.



विभाग ४ - भाषा अध्यन (व्याकरण)

प्र. ४ (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती सोडवा.

(१) समास - **(2)**

पुढील विग्रहांवरून सामासिक शब्द ओळखा.

i. ऋणापासून मुक्त → .....

ii. पाच आरत्यांचा समूह → .....

(२) वाक्यप्रचार - **(2)**

खालील पादीतील वाक्यप्रचार वाक्यात योग्य ठिकाणी वापरुन वाक्ये पुन्हा लिहा.

वाक्प्रचारांचा अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा.

थापा मारणे →

(आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.

1) शब्दसंपत्ती - **(2)**

i. दोन उपसर्ग घटित शब्द लिहा.
ii. दोन प्रत्ययघटित शब्द लिहा.

2) विरामचिन्हांचा योग्य वापर करा. **(1)**

उद्‌या मला शाळेत जाता येईल का असा विचार करीत राम झोपला

विभाग ५ - उपयोजित लेखन

प्र. ५ (1) खालील विषयावर पत्र लिहा. **(5)**

खालील निवेदन वाचा व त्याखालील कृती सोडवा.



(2) बातमी लेखन **(5)**

विषय : - तुमच्या शाळेत बालदिन साजरा झाला याचे बातमीलेखन करा.
यात स्थळ, काळ, दिनाक, वेळ, व्यक्ती यांचा उल्लेख करावा.